

**आपल्या दिवसभराच्या कामाच्या धावपळीनंतर घरी आल्यावर प्रत्येकाला एक स्वतंत्र अशी 'स्पेस' आवश्यक असते ती त्याला मिळते त्याच्या 'बेडरूम'मध्ये. 'मन' आणि 'शरीर' या दोघांनाही रिफ्रेश करणारी घरातली जागा म्हणजे 'बेडरूम'.**

**अगदी वन बेडरूमपासून सुरू होणारी अपार्टमेंट्स ३/४ बीएचकेपर्यंत उपलब्ध झाल्यामुळे घरातल्या प्रत्येकाला आपल्या आवडीनुसार आपली बेडरूम डिझाइन करता येऊ लागली आहे.**

विल्यम शेक्सपियरनं आपल्या 'ट्वेल्थ नाइट' या नाटकात एका 'कलोसल बेड'चा उल्लेख केला आहे. इंग्लंडमध्ये असलेल्या या 'बेड'विषयी शेक्सपियर लिहितो की, या बेडचा आकार इतका प्रचंड मोठा होता की त्यावर एकावेळी ६८ पाहुणे व्यवस्थित विश्रांती घेऊ शकत होते.

या कलोसल बेडबरोबरच इंग्लंडची राणी ॲनच्या पलंगाबद्दलही अनेक आख्यायिका प्रसिद्ध आहेत. राणीचा हा पलंग सात फूट रुंद आठ फूट लांब, ११ फूट उंच तर होताच पण त्याहूनही विशेष म्हणजे या पलंगावर सॅटिन सिल्कची केलेली ड्रेपरी आणि सोन्यामध्ये केलेली कलाकुसर फारच आकर्षक होती.

युरोपीय देशांमध्ये राजेरजवाड्यांच्या 'बेडरूम'चं डिझाइन, त्यांचे पलंग, त्यावरची कलाकुसर त्या राजघराण्याच्या वैभवाचं प्रतीक होतं. युरोपप्रमाणे आपल्या देशातही राजे, नवाबांचे लाकडामध्ये कोरीवकाम केलेले, सोन्या-चांदीच्या पत्र्याचे आच्छादन असलेले पलंग आजही अनेक पुरातन वस्तूसंग्रहालयात आपल्याला बघायला मिळतात.



# भिती आणि निर्मिती

● केतन गाडगीळ



आपल्या दिवसभराच्या कामाच्या धावपळीनंतर घरी आल्यावर प्रत्येकाला एक स्वतंत्र अशी 'स्पेस' आवश्यक असते ती त्याला मिळते त्याच्या 'बेडरूम'मध्ये. 'मन' आणि 'शरीर' या दोघांनाही रिफ्रेश करणारी घरातली जागा म्हणजे 'बेडरूम'.

अगदी वन बेडरूमपासून सुरू होणारी अपार्टमेंट्स ३/४ बीएचकेपर्यंत उपलब्ध झाल्यामुळे घरातल्या प्रत्येकाला आपल्या आवडीनुसार आपली बेडरूम डिझाइन करता येऊ लागली आहे.

पूर्वी 'झोपायची खोली' अशी व्याख्या किंवा टर्मिनॉलॉजी असलेली बेडरूम आजकाल मास्टर बेड, चिल्ड्रेन्स बेड, पेरेंट्स बेड, गेस्ट बेड, टेनिस ब्रेड अशी नानाविध लेबल्स लावून आपल्या पुढ्यात येऊ लागली आहेत. उपलब्ध जागेनुसार बेडरूमची होणारी रचना किंवा कमी जागेत जास्त रूमची गर्दी केल्याने होणारी गैरसोयही आजकाल अनेक फ्लॅट्समध्ये दिसते. म्हणूनच बेडरूमची रचना करताना त्या रूममध्ये आपल्याला लागणाऱ्या आवश्यक फर्निचरचा विचार करून त्या फर्निचरच्या मांडणीचा 'लेआऊट' पक्का करून ठरवलेला 'बेडरूम'चा साइज वापरण्याच्या दृष्टिकोनातून सोयीचा ठरतो.

बेडरूमच्या साइजमध्ये त्याचा आकार चौकोनापेक्षा

करता येतो. या आयताकृती आकाराबरोबरच उपलब्ध असणाऱ्या खोलीच्या सर्व भिंतींवर खिडक्या न घेता एखादी बेडवॉल ठेवल्यास वॉर्डरोबसारख्या लांबरुंद फर्निचर युनिटची आखणी चांगली करता येते.

हल्ली किचन आणि डाइनिंग एकत्र करून दोन तरी बेडरूम तयार होतील अशीच रचना बहुतांशी अपार्टमेंटमध्ये दिसू लागलीय. त्यामुळे अर्थातच बेडरूममधील सामानांची विभागणीही होऊ लागलीय.

लहान आकारातील बेडरूममध्ये, खोलीच्या दरवाज्याचं ओपनिंग, खिडकीची जागा यांचा विचार करून केलेल्या फर्निचरच्या आखणीमुळे वापरायची जागा जास्त मिळू शकते. बेडरूमची जागा कितीही लहान असली तरी दिवाण, कपड्यांचे कपाट या वस्तू तरी ठेवाव्याच लागतात. त्यामुळे खोलीच्या आकाराच्या तुलनेत सामानाची गर्दी वाटण्याची शक्यता असते अशावेळी केलेल्या फर्निचरचे रंग चांगले वापरून दिवाणांची उंची थोडी कमी करून, ती लहान खोली मोठ्या असल्याचा भास निर्माण करता येतो. जसे फ्लॅटचे आकार वाढले तशा खोल्याही वाढल्या आणि त्या खोल्यांचे साइजही आणि अर्थातच खोलीत समाविष्ट करण्याच्या गोष्टींच्या याद्याही वाढल्या आहेत. अटॅच्ड टॉयलेट असलेल्या बेडरूममध्ये टॉयलेटला लागूनच 'वॉक इन क्लोजेट्स'च बहुतेक घरात दिसू लागली आहेत. वॉक इन क्लोजेट्स, ड्रेसिंग टेबल, राइटिंग टेबल, लहान आकारातील कॉफी टेबल, टीव्ही युनिट व पुस्तकांची आवड असणाऱ्यांच्या बेडरूममध्ये बुक शेल्फची व्यवस्थाही केली जाऊ लागलीय.

बऱ्याच ठिकाणी बेडरूमला जोडून असणाऱ्या टेरेसमुळे त्या खोल्यांचा प्रशस्तपणा अधिकच वाढू लागला आहे. तर काही वेळा काही ठिकाणी बेडरूम प्रशस्त करण्याच्या नादात बेडरूमला आवश्यक असणारा एक 'कोझी' फीलच बरेच जण घालवून टाकताना दिसतात.

बेडरूममध्ये आवश्यक असणारा एक कम्फर्टेबल निवांतपणा मिळण्यासाठी, त्या रूमच्या रचनेचा अनेक अंगांनी विचार करावा लागतो.

'बेडरूम इंटिरियर' हाच एक मोठा विषय आहे. त्या रूमचे फर्निचर त्याची रंगसंगती, टेक्सचर, लाइटिंग विषयीही बरंच काही सांगण्यासारखं आहे. पण ते या एका लेखात सामावणारं नाही म्हणूनच एकेका टप्प्यावर त्याविषयी जाणून घेऊया.